


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे | अंक : ३१८ वा | गुरूवार दि १२ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किमंत३ रुपये

# अमेरिकेकडून सवलत, रशिया तेल द्यायला तयार; पण एसबीआय न प्रतिष्ठेचा मुद्दा काढला

**वृत्तसंस्था/मॉस्को**


मॉस्को: मध्य पूर्वेत युद्ध सुरु असल्यानं खनिज तेलाचे दर आभाळाला भिडले आहेत. त्यामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांसमोर संकट उभं ठाकलं आहे. अमेरिकेनं भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्याची सवलत दिली आहे. त्यामुळे भारताला काहीसा दिलासा मिळाला आहे. पण रशियाकडून तेल खरेदी सोपी नाही. देशातील सर्वात मोठी सरकारी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियानं रशियन तेलाचे पैसे चुकते करण्याची प्रक्रिया करण्याची तयारी दर्शवलेली नाही. अमेरिकेनं दिलेली सवलत किती कालावधीपर्यंत सुरु राहणार, याबद्दल बँकेकडे कोणतीही स्पष्टता नाही, त्यामुळे एसबीआय रशियन तेलाचे पैसे देण्याची प्रक्रिया करण्यास राजी नाही. ब्लूमबर्गनं सुत्रांच्या हवाल्यानं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. अशा व्यवहारात सहभागी झाल्यास जोखीम पत्करावी लागेल, असं बँकेला वाटतं. कारण जागतिक बाजारपेठेत एसबीआयचा लोन पोर्टफोलियो मोठा आहे. यामुळे बँकेच्या प्रतिष्ठेला धक्का बसू शकतो, असं एसआयबीला वाटतं. अमेरिकेनं भारताला रशियाकडून तेल खरेदीसाठी ३० दिवसांची सवलत दिली आहे. पण ही तेल खरेदी सोपी असणार नाही. ऑक्टोबरमध्ये रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल उत्पादक कंपन्या (रोसनेफ्ट आणि लुकोईल) यांच्यावर अमेरिकेनं निर्बंध लादले. त्यानंतर एसबीआयनं रशियन तेल आयातीशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारापासून दूर राहणं पसंत केलं आहे गेल्या वर्षीच्या अखेरीस भारतातील काही बँका रशियन तेल खरेदीचा विचार करण्यास तयार झाल्या होत्या. आयात केलं जाणारं तेल कोणत्याही काळ्या यादीतील कंपनीचं नसावं अशी बँकांची अट होती. आता रशिया भारताला तेल देण्यास तयार आहे. यासाठी अमेरिकेचीही हरकत नाही. पण सगळा विषय आर्थिक व्यवहारावर अडकला आहे. एसबीआयनं थेट प्रतिष्ठेचा विषय केल्यानं व्यवहार अडकले आहेत. मध्य पूर्वेत गेल्या ११ दिवसांपासून भीषण युद्ध सुरु आहे. २८ फेब्रुवारीपासून युद्धाला सुरुवात झाली. युद्ध संपण्याची चिन्हं दिसत नसल्यानं जगभरात चिंता व्यक्त होत आहे. जगभरातील बहुतांश देशांना मध्य पूर्वेतून खनिज तेलाचा, नैसर्गिक वायूचा पुरवठा होतो. त्यामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांसमोर संकट आ वासून उभं आहे.




# पुण्यात कॉलेज हॉस्टेलसमोरच तरुणीवर हल्ला; हल्लेखोर गावातीलच निघाला, विद्यार्थ्यांमध्ये भीतीचं वातावरण

**वृत्तसंस्था/ पुणे**

जुन्नर शहर बुधवारी सकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने अक्षरशः हादरून गेले. सकाळी साधारण ११ वाजण्याच्या सुमारास आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहासमोर एक तरुण अचानक आला आणि काही कळायच्या आत त्याने महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर धारदार हत्याराने सपासप वार केले. दिवसाढवळ्या घडलेल्या या थरारक प्रकारामुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं. मिळालेल्या माहितीनुसार, २० वर्षीय एक विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे वसतिगृहाच्या परिसरात उभी होती. त्याच वेळी महेश मुरलीधर डामसे नावाचा तरुण तेथे आला. सुरुवातीला काय घडतंय हे कुणालाच समजलं नाही. मात्र काही क्षणांतच त्याने हातातील धारदार हत्यार काढलं आणि तरुणीवर वार करण्यास सुरुवात केली. आरोपीने तिच्या चेहऱ्यावर आणि मानेवर सपासप वार केल्याची माहिती समोर येत आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थिनी आणि नागरिक घाबरून गेले.



आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिक आणि विद्यार्थिनी धावत बाहेर आल्या. मात्र तोपर्यंत आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता. जखमी अवस्थेत पडलेल्या विद्यार्थिनीला स्थानिकांनी तातडीने उचलून जवळच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या तिच्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, जखमी विद्यार्थिनी आणि हल्ला करणारा तरुण हे दोघेही एकाच गावचे असल्याचे समोर आले आहे. आरोपी काही दिवसांपासून त्या तरुणीला त्रास देत होता, अशीही माहिती स्थानिकांकडून सांगितली जात आहे. त्यातूनच हा हल्ला झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच जुन्नर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पंचनामा केला असून फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. या घटनेमुळे जुन्नरमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपीला तातडीने अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# उंबरठ्यावरील युद्धझळा




इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्ध पश्चिम आशियात सुरू असले, तरी त्यातून निर्माण झालेली आनुषंगिक संकटे गॅसटंचाईमुळे आपल्या स्वयंपाकघरात येऊन ठेपली आहेत. शेअर बाजारात दररोज होत असलेले भूकंप, बंदरांमधील जहाजांमध्ये कुलूपबंद झालेली आयात-निर्यात, तेलाच्या दरांमधील चढउतार आणि स्वयंपाक व औद्योगिक गॅसच्या तुटवड्याने ठिकठिकाणी दिसून येणाऱ्या रांगा-दरवाढ यांचे चटके आता सर्वसामान्यांना बसू लागले आहेत. एकीकडे तेलाचा ओघ आटू लागल्याने आयातीवर आलेला ताण आणि निर्यात रखडल्याने शेतीमाल-फळांसारख्या नाशवंत मालाचे संभाव्य नुकसान होण्याची भीती आहे. विशेषतः द्रवरूप नैसर्गिक वायूचा पुरवठा विस्कळित झाल्याने महाराष्ट्रापासून गुजरातपर्यंत अनेक उद्योगांचे उत्पादनचक्र थंडावत असल्याचे चित्र दिसते आहे. अशा एकाच वेळी मंदी व महागाईच्या दुहेरी कात्रीत सापडण्याची भीती साधार ठरू लागली आहे. रशियन तेलाचा पुरवठा सुरू राहणार असल्याने सध्या तरी भारत सुपात असला, तरी युद्ध लांबल्यास होणाऱ्या जागतिक परिणामांमुळे आपणही जात्यात येण्यास वेळ लागणार नाही, अशी परिस्थिती दिसते. करोना साथीनंतर सावरलेल्या जगाला युद्धज्वरामुळे पुन्हा फटके बसण्याची भीती उभी राहिली आहे. गेल्या काही काळात जगभरात विकासदर मंदावला असला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने या काळातही ब्रिटन आणि जपानसारख्या देशांना मागे टाकून मोठी भरारी घेतली होती. मात्र, या वेगाला इराण-अमेरिका आणि इस्रायल युद्धाची नजर लागली, असे म्हणावे लागेल. विशेषतः इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची वाहतूक रोखल्याने तेलसंकट उभे राहिले आहे. याचा साहजिक परिणाम म्हणून कतारसारख्या देशाने गॅसचे उत्पादन थांबवले. भारतातील अनेक उद्योगांतील उत्पादनचक्र त्यामुळे थंडावते आहे. छत्रपती संभाजीनगरसारख्या भागातील अभियांत्रिकी कारखान्यांतील उत्पादनांपासून ते गुजरातमधील ङ्गसिरॅमिकफ उत्पादन थंडावले असून, हजारो कामगार बेरोजगार होण्याची भीती आहे. तज्ज्ञांच्या मते युद्ध सुरू झाल्यापासून जगभरातील तब्बल १८ कोटी बॅरल इंधनाचा पुरवठा बाधित झाला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या दरांनी शंभरी ओलांडली होती; अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ङ्गयुद्ध समाप्तीच्या दिशेनेफ असल्याचे विधान केल्याने तेलाच्या दरवाढीला काहीसा ब्रेक लागला असला, तरी कोणीही स्थैर्याची हमी देऊ शकत नाही. इंधनावर अवलंबून असलेला वाहन उद्योग, रंग उद्योग, टायर, प्लास्टिकसारख्या अनेक क्षेत्रांना फटके बसत आहेत. आखातातून होणारा खतांचाही पुरवठा थांबला आहे आणि केळी, द्राक्षे, कांद्यापासून कलिंगडापर्यंत शेतीमालाची निर्यात रखडल्याने बळीराजा दुहेरी चिंतेत आहे. या अस्थिर परिस्थितीचे फटके पर्यटनालाही बसत आहेत. तेजी-मंदीच्या लाटांवर स्वार होणाऱ्या जगातील शेअर बाजारांमध्ये या अस्थिरतेचे प्रतिबिंब न दिसते तरच नवल! मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक अडीच हजार अंकांनी घसरून नंतर सावरला, तर ङ्गनिफ्टीफ्तही सव्वाचारशे अंकांनी घट झाली. नागरिकांमधील चिंता आणि परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या साठेबाजांना चाप लावण्यासाठी केंद्र सरकारने अत्यावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (इस्मा) लागू केला असला, तरी अनेक शहरांमध्ये सिलिंडरसाठी लागलेल्या रांगा, या सर्वसामान्यांमधील घबराटीचेच निदर्शक म्हणाव्या लागतील. अशा स्थितीत उपाययोजनांची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे; त्याप्रमाणेच ऊर्जेबाबत स्वयंपूर्णतेचे लक्ष्य मैलोगणती दूर असले, तरी त्या दिशेने वाटचालीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्याची आणि धोरणात्मक स्वायत्तता राखून ऊर्जापुरवठ्यातील विविधीकरणाची जाणीव या निमित्ताने अधोरेखित होते. युद्धाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ङ्गभारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे,फ अशी देशाची भूमिका स्पष्ट केली; तसेच तणाव कमी करण्यावर भर देऊन या देशांतील भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली. मात्र, त्यातून युद्धविषयक सडेतोड भूमिकेची अपेक्षा पूर्ण न झाल्याने आणि संसदेत चर्चेची संधी न मिळाल्याने विरोधक आक्षेप घेणे साहजिक आहेत. इंधन तुटवडा आणि दरवाढीने जग होरपळत असून गरीब-विकसनशील देशांचे अर्थकारण मोडून पडत आहे. मात्र, ङ्गशांतता आणि सुरक्षिततेसाठी ही किंमत किरकोळ आहे,फ ही ट्रम्प महाशयांची दिव्यवाणी त्यांना जगाची किती चाड आहे, हेच दर्शवणारी आहे, एवढे मात्र खरे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# दगाफटक्याच्या भीतीने राष्ट्रवादी-शिवसेनेचे सदस्य पर्यटनाला, दावा करणाऱ्या भाजपची चिंता वाढली

**सातारा :** रायगडमध्ये शिवसेनेचे सर्वाधिक जिल्हा परिषद सदस्य आहेत. पण राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांचे राजकीय हाडवैर सर्वश्रुत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला सोबत घेतले आहे. साताऱ्यात मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांचे राजकीय सूत चांगलेच जुळले आहे. त्यामुळे भाजपला रायगड जिल्हा परिषदेच्या सत्तेत वाटा मिळेल, पण सर्वाधिक सदस्य असतानाही साताऱ्यात सत्तेच्या वाट्यासाठी झगडण्याची वेळ भाजपवर आली आहे.जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष निवडीचे काउंटडाउन सुरू झाले असताना राष्ट्रवादीच्या सदस्यांचा म्हैसूरमधील प्रसिद्ध वृंदावन गार्डन आणि




पंचतारांकित हॉटेल रॉयल ऑर्किडसम रेील एक फोटो नुकताच समोर आला आहे. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे झेडपी सदस्य दक्षिण भारतातील कर्नाटक आणि केरळमध्ये ट्रीप एन्जॉय करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची निवड २० मार्च रोजी होणार आहे. कमळ चिन्हावर निवडून आलेले भाजपचे २७ आणि एका अपक्षाच्या पाठिंब्यासह सर्वाधिक २८ सदस्य असल्याने अध्यक्ष हा भाजपचाच झाला पाहिजे, अशी ठाम भूमिका भाजप नेते जयकुमार गोरे यांनी घेतली आहे. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेस २०, शिवसेना १५, काँग्रेस १ आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना १, अशा ३७ सदस्यांच्या जोरावर राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना सत्ता स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहेत.भाजपकडून घोडेबाजार आणि फोडाफोडीच्या राजकारणाचा संभाव्य धोका ओळखून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने आपल्या सदस्यांना 'सेफ स्टेट' म्हणून दक्षिण भारतातील काँग्रेस शासित कर्नाटक, केरळच्या सहलीवर पाठवले आहे. सदस्यांची संपूर्ण बडदास्त ठेवण्याची जबाबदारी दोन्ही पक्षांनी आपल्या खास शिलेदारांवर सोपवली आहे. म्हैसूर, उटीमध्ये राष्ट्रवादीचे झेडपी सदस्य पर्यटनाचा आनंद लुटतानाचे एक छायाचित्र देखील समोर आले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीला १० दिवस उरले आहेत. त्यामुळे अध्यक्ष निवडीचे काउंटडाउन सुरू झाले आहे. अध्यक्ष निवडीत भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेकडून आपापल्या सदस्यांना व्हीप काढला जाईल. पण मतदान गुप्त पद्धतीने होणार की हात वर करून होणार? हे देखील महत्त्वाचे असणार आहे. दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीपूर्वी १६ मार्चला जिल्ह्यातील ११ पंचायत समि तीच्या सभापती निवडी होणार असून काही पंचायत समितींमध्ये राजकीय उलथापालथी पाहायला मिळतील.

## आमदारांचे कँटीन बंद; सरकारने भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

**मुंबई :** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे राज्यात गॅसचा तुटवडा निम र्ाण झाला असून त्याचे पडसाद बुधवारी विधानसभेच्या कामकाजात उमटले. काँग्रेसचे विधिमंडळातील गटनेते विजय वडेट्टीवार यांनी याप्रश्नी सरकारने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली. तर याप्रश्नी सरकारने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.एकीकडे सरकार विकासाच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे जनतेला आपली चूल कशी पेटवायची, याची चिंता सतावत आहे. सरकारने या गंभीर परिस्थितीवर तात्काळ आपली भूमिका स्पष्ट करावी'.अधिवेशनाच्या मंगळवारच्या कामकाजादरम्यान गॅस तुटवड्याचा फटका आमदारांना बसल्याचे दिसून आले. मंगळवारचे कामकाज रात्री एक वाजेपर्यंत सुरू असताना कँटिन बंद होते. मुंबई आणि नागपूरमधील सुमारे ३० टक्के हॉटेल्स गॅस तुटवड्यामुळे बंद ठेवली आहेत. याचा मोठा फटका अर्थव्यवस्थेला बसत असल्याची माहिती वडेट्टीवार यांनी दिली.गॅसच्या तुटवड्यामुळे मंगळवारी १८



लाख रुपयांच्या सिलिंडरची गाडी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. ही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने भयावह स्थिती आहे. गॅस टंचाईच्या निषेधार्थ कोल्हापूर आणि विदर्भासह राज्यभरात आंदोलने सुरू झाली आहेत. महिला भगिनींमध्ये चिंतेचे वातावरण आहे, असे वडेट्टीवार म्हणाले. सिलिंडरच्या दरवाढीविरोधात काँग्रेसतर्फे आज, गुरुवारी राज्यभर आंदोलन केले जाणार आहे. केंद्र सरकारने ही दरवाढ तत्काळ मागे घ्यावी आणि घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडर ग्राहकांना सहज उपलब्ध करून द्यावेत, या मागणीसाठी हे आंदोलन केले जाणार असल्याचे पक्षातर्फे जाहीर करण्यात आले आहे. गॅसचा तुटवडा नाही हा सरकारचा दावा चुकीचा असून सर्वसामान्य जनता व हॉटेल व्यावसायिक यांना गॅस उपलब्ध होत नाही.

## मुक्ताईनगर जमीन व्यवहारप्रकरण अंगलट

**जळगाव :** एकनाथ खडसे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी खडसे यांच्याविरोधात 'एसआयटी' नेमण्याचे आदेश दिले आहेत. या चौकशीसाठी सहा विभागांतील अधिकारी सहभागी होणार आहेत. संबंधित प्रकरण नऊ गावांतील जमिनींशी जोडलेले असल्याचे सांगितले जात आहे.भाजप आमदार मंगेश चव्हाण यांनी केलेल्या आरोपानुसार मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय महामार्ग विस्तारीकरण सुरू आहे. २५ जानेवारी २०२२ मध्ये या संदर्भात राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले होते. यासाठी ५६.८० हेक्टर जमिन भूसंपादन करण्याचा निर्णय सरकारने १३ जानेवारी २०२३ ला घेतला होता. मोठा मोबदला लाटण्यासाठी एकनाथ खडसे यांनी १४ दिवसांनी २७ जानेवारी २०२३ रोजी अधिसूचित झालेल्या जमिनीपैकी काही जमीन खरेदी केली असल्याचा आरोप मंगेश चव्हाण यांनी केला आहे. पंधरा लाख २२ हजार रुपयांचे खरेदीखत दाखवले. साडेतीन वर्षांनंतर त्यांच्या लाभात हस्तांतरण केले. खरेदी आधी तिथे झाडे लावली.

## घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध; अफवांवर विश्वास ठेवू नका

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही भू-राजकीय परिस्थिती मुळे इंधन पुरवठ्याबाबत विविध प्रकारच्या बातम्या प्रसारित होत असल्या तरी नागरिकांनी कोणताही गैरसमज करून घेऊ नये. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून वितरण व्यवस्था नियमितपणे सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने ९ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार देशात घरगुती एलपीजी उत्पादनाला प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार देशातील तेल शुद्धीकरण कंपन्यांना प्रोपेन आणि ब्यूटेन यांसारख्या घटकांचा वापर प्राधान्याने एलपीजी उत्पादनासाठी करून तो सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना - इंडियन ऑईल (आयओसीएल ), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल ) उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या



एलपीजीचा पुरवठा प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसाठी करण्यात येणार आहे.घरगुती ग्राहकांना एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू राहील. तसेच रुग्णालये, शैक्षणिक संस्था यांसारख्या अत्यावश्यक गैर-घरगुती क्षेत्रांनाही आवश्यकतेनुसार एलपीजी पुरवठा करण्यात येणार आहे. इतर गैर-घरगुती क्षेत्रांच्या मागण्यांचे परीक्षण करून प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी तेल विपणन कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समितीही स्थापन करण्यात आल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.तर विभागातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना घरगुती एलपीजी गॅसच्या सुरळीत वितरणासाठी तसेच घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी जिल्हास्तरावर दक्षता फिरते पथक स्थापन करून तपासण्या करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

## हॉटेल-केटरिंग व्यवसायावर 'दुसऱ्या करोना'सारखी वेळ, हॉटेल बंद

**छत्रपती संभाजीनगर :** व्यावसायिक गॅसचा पुरवठा ठप्प झाल्यामुळे हॉटेल, खानावळी बंद पडू लागल्या आहेत आणि शहरातील किमान १० ते १२ हॉटेल बंद झाले आहेत व पुढील दोन दिवसांत निम्मे हॉटेल बंद होऊ शकतात अशी स्थिती आहे. त्याचवेळी लाकडासह इंडक्शन भट्टीचा वापर करून लग्नतिथी किंवा इतर सभा-समारंभाचे पूर्वीच घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी केटरिंग व्यावसायिकांकडून शर्थ लढवली जात आहे. मात्र यात कितीतरी जास्त अडचणी येत आहेत व अशी कसरत पुढच्या काही दिवसानंतर शक्य होणार नसल्याचेही स्पष्ट झाले आहे.गॅस तुटवड्याच्या फटक्याने गंभीर स्थिती ओढावली आहे व हॉटेल, खानावळी तसेच केटरिंग व्यवसायाचे चक्र थंडावल्याचे स्पष्ट झाले आहे. गॅसअभावी मागच्या दोन दिवसांत शहर परिसरातील किमान १० ते १२ हॉटेल, रेस्टॉरंट बंद पडले आहेत. तर, सध्या सुरू असलेल्या बहुतेक हॉटेल, खानावळींमध्ये मोजक्या एक किंवा दोन दिवसांचा गॅस शिल्लक आहे व हा



शिल्लक साठा संपल्यानंतर निम्म्यापेक्षा जास्त हॉटेल, रेस्टॉरंट, खावानळी बंद पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुन्हा बहुतेक सर्वच हॉटेलांमध्ये इंडक्शन तसेच लाकडाच्या भट्टीचा वापर सुरू झाला आहे. त्याचवेळी हॉटेलांमध्ये मिळणारे खाद्यपदार्थ निम्म्यापेक्षा कमी झाले आहे व मोजक्या पदार्थांसह हॉटेल, रेस्टॉरंट व खानावळी चालवण्याची वेळ व्यावसायिकांवर आली आहे. या संदर्भात हॉटेल व्यावसायिक किशोर शेट्टी म्हणाले, आमच्याकडे आता फक्त दोन दिवसांचा गॅसचा साठा आहे व त्यानंतर हा साठा शून्यावर येणार आहे. हा साठा शून्य झाल्यानंतर इंडक्शन भट्टीच्या आधारे मोजके खाद्यपदार्थ देण्याचा प्रयत्न केला जाईल. दैनंदिन ग्राहक, कर्मचारी, विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून मोजक्या पदार्थांसह हॉटेल सुरू ठेवण्याचा प्रयत्न असेल. मात्र एरवी उपलब्ध केले जाणारे २०० ते ३०० खाद्यपदार्थ उपलब्ध करणे नक्कीच शक्य होणार नाही, असेही शेट्टी यांनी ' बोलताना सांगितले.पूर्वी घेतलेल्या ऑर्डर कशा-बशा पूर्ण करण्यासाठी अगदी कसरत करावी लागत आहे, असे सांगताना केटरिंग व्यावसायिक राजेश कुलकर्णी म्हणाले, केवळ पूर्वी काम घेतले आहे व शब्द पाळण्यासाठी हे काम केले जात आहे. वस्तुत: गॅस उपलब्ध नसल्याने लाकडावर तसेच इंडक्शनच्या भट्टीवर स्वयंपाक करावा लागत आहे. मात्र अशा प्रकारे जेवण तयार करण्यासाठी जास्त वेळ लागत आहे. धुराचा त्रासही वाढला आहे आणि जास्त वेळ लागून कमी माणसांचा स्वयंपाक तयार होत आहे. वेळ जास्त लागत असल्याचे म जुरीचा खर्च दीडपटीने वाढला आहे. अशी ही पद्धत खूप दिवस चालू शकत नाही, असेही कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे याबाबत लवकरच काही तरी ठोस निर्णय घ्यावा लागेल व संघटनेच्या मार्फत हा निर्णय होईल, असेही त्यांनी नमूद केले.या स्थितीमुळे विवाह सोहळे किंवा इतर कार्यक्रम-उपक्रम सध्या तरी पुढे ढकलण्यात आले नसले तरी पुढच्या टप्प्यात ही वेळ येऊ शकते, असेही सांगण्यात येत आहे. त्याचबरोबर ही स्थिती बदलली नाही तर विवाह सोहळे व इतर मंगल कार्यालये, कार्यक्रम थोडक्यात उरकून घेण्याकडे कल वाढू शकतो, असेही सांगितले जात आहे.

जोपर्यंत गॅस उपलब्ध आहे तोपर्यंतच हॉटेल-रेस्टॉरंट सुरू राहू शकतात. त्यामुळे अनेक हॉटेल बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. इंडक्शनच्या भट्टीवर काय देता येऊ शकेल, याचा विचार सुरू असून, नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून ग्राहकांना सेवा दिली जाईल.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रूममेट्सच्या मानसिक त्रासाला कंटाळून १९ वर्षीय तरुणीनं जीवन संपवलं; तिघींविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे :** रूममध्ये सोबत राहणाऱ्या मैत्रिणींकडून मिळणाऱ्या सततच्या धमक्या आणि मानसिक त्रासाला कंटाळून १९ वर्षीय तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना चंदननगर परिसरात घडली आहे. पायल राजगुरू असे या तरुणीचे नाव आहे. या प्रकरणी संबंधित तिघींविरुद्ध चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पायल ही चंदननगर परिसरातील महावीर सोसायटीमध्ये राहत होती. त्याच रूममध्ये तिच्यासोबत काही मुलीही वास्तव्याला होत्या. गेल्या काही दिवसांपासून या तरुणींमध्ये काही कारणास्तव वाद सुरू होते. आरोप आहे की, पायलसोबत राहणाऱ्या त्या मुली तिला सातत्याने मानसिक त्रास देत होत्या. तिची समाजात बदनामी करण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या. एवढेच नव्हे, तर 'तुझ्या आई-वडिलांना मारून टाकू', अशा आशयाच्या धमक्या देऊन तिला भीतीखाली ठेवण्यात आले होते.मिळालेल्या धमक्या आणि सततच्या छळामुळे पायल प्रचंड मानसिक तणावात होती. कोणाकडे दाद मागावी आणि हा त्रास कसा थांबवावा, या विवंचनेत असतानाच तिने आयुष्य संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतला.




राहत्या खोलीत पंख्याला दोरी बांधून तिने गळफास घेतला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर चंदननगर पोलिसांना तातडीने पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तिचे कलेवर शवविच्छेदनासाठी पाठवले.सुरुवातीला या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, तपासादरम्यान सबुरीला देण्यात येणाऱ्या धमक्या आणि त्रासाची माहिती समोर आल्यानंतर, पोलिसांनी संबंधित तिघींवर गुन्हा दाखल केला आहे. जीवन संपवण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून, या तरुणींमध्ये नक्की कोणत्या कारणावरून वाद होते, याचा तपास आता पोलीस करत आहेत.एका १९ वर्षीय तरुणीचा असा दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने वसतिगृहात किंवा रूम शेअरिंगमध्ये राहणाऱ्या तरुणींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पुढील तपास चंदननगर पोलीस करत आहेत.

## कारच्या धडकेत चिमुकल्याचा मृत्यू

**मुंबई :** मागील महिन्यात मालाडमधील हाउसिंग सोसायटीच्या पार्किंग क्षेत्रात बेदरकारपणे वाहन चालवून चार वर्षांच्या मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या रहिवाशाला जामीन देण्यास मुंबई सत्र न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. 'आरोपीला जामीन दिल्यास पोलिसांच्या तपासावर परिणाम होऊ शकतो. तो फरार होण्याची शक्यता नाकारता येत नाही,' असे कारण नोंदवत न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज नुकताच फेटाळला. दिंडोशी पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरनुसार, ७ फेब्रुवारी रोजी अनेक मुले पार्किंग क्षेत्रात खेळत असताना आरोपी रमेश जत्रारा याने त्याची इनोव्हा गाडी बेदरकार पद्धतीने बाहेर काढली. त्यावेळी चार वर्षांच्या मुलाला गाडीची धडक बसल्याने तो गंभीर जखमी होऊन नंतर त्याचा मृत्यू झाला. त्याला वैद्यकीय साह्य न देताच आरोपी निघून गेला आणि नंतर सोसायटीच्या रखवालदाराने तक्रार दाखल केली. लग्नाच्या वीस वर्षांनंतर घरात पाळणा हलल्याने आनंदी झालेल्या कुटुंबावर एका क्षणात दुःखाचा डोंगर कोसळला.सोसायटीच्या पार्किंग क्षेत्रात मुले खेळत असतात आणि




आपण बेफिकीरपणे वाहन चालवल्यास एखाद्याच्या जीवावर बेतू शकते, याची आरोपीला पूर्ण जाणीव होती. तरी त्याने ते कृत्य केले. तसेच, पार्किंगवरून वाद असल्याने आरोपीने जाणीवपूर्वक हे कृत्य केले,' असा आरोप मृत मुलाच्या कुटुंबीयांनी केला आहे.आरोपीने मुलाचा मृत्यू होईल, अशी हेतूपुरस्सर कृती केली नाही. हा प्रकार दुर्दैवी अपघाताचा आहे. जत्रारानेच जखमी मुलाला रुग्णालयात नेले. केवळ पीडित कुटुंबाच्या दबावामुळे भारतीय न्याय संहितेचे कलम १०५ (खून नसलेला मनुष्यवध) हे कलम पोलिसांनी नंतर समाविष्ट केले,' असा युक्तिवाद आरोपीचे वकील अक्षय शेट्टी यांनी न्यायालयात केला. मात्र सरकारी पक्षाने विरोध केला.आरोपीच्या कृत्यामुळेच मुलाचा मृत्यू झाला.

## अपमानास्पद वागणुकीला कंटाळून सासऱ्याची आत्महत्या

**सोलापूर :** सुनेच्या त्रासाला कंटाळून सासऱ्याने आत्महत्या केली आहे. सून ही नेहमी सासऱ्याला धकमकावत होती, 'तुला घरातून हाकलून देईन', अशी धमकी ती नेहमी देत असायची. सततच्या अपमानाला कंटाळून वृद्ध सासऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे.सुनेच्या त्रासाला कंटाळून बार्शी येथे एका ७३ वर्षीय वृद्धाने आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त होत आहे. सुनेच्या जाचाला कंटाळून राहत्या घरात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल मंगळवारी रोजी सकाळी उघडकीस आली आहे. सर्जेराव शंकर नायकुडे (वय ७३, रा उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर) असं आत्महत्या केलेल्या वृद्ध सासऱ्याचं नाव आहे. मयत सर्जेराव शंकरराव नायकुडे यांचा मुलगा महेश नायकुडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.सर्जेराव नायकुडे हे बार्शीतील 'वसुंधरा' बंगल्यात राहत होते. फिर्यादी महेश नायकुडे यांचा भाऊ उमेश याची पत्नी सारिका नायकुडे ही गेल्या काही महिन्यांपासून नोव्हेंबर २०२५ पूर्वीपासून सर्जेराव नायकुडे यांना किरकोळ कारणावरून वारंवार अपमानित करत होती.

## ९ मिनिटांचा कॉल, मेडिकल विद्यार्थिनीने आयुष्य संपवलं, डॉक्टरला अटक

**हैदराबाद :** पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने आयुष्याची अखेर केल्याप्रकरणी डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील रहिवासी बटुला दीपिका हिने फेब्रुवारीत इंजेक्शनद्वारे औषधांचा ओव्हरडोस घेत स्वतःला संपवल्याचा आरोप आहे. डॉक्टर अमर सहस्य याच्यासोबत दीपिकाचे प्रेमसंबंध असल्याचा संशय फोन रेकॉर्ड तपासल्यानंतर पोलिसांना आला. त्यानंतर महिन्याभराने ही कारवाई करण्यात आली. विजयवाडा येथील सिद्धार्थ मेडिकल कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनच्या शेवटच्या वर्षाची विद्यार्थिनी असलेली बटुला दीपिका ही ॲनेस्थेसियोलॉजीचा अभ्यास करत होती. विजयवाडा येथील सरकारी जनरल हॉस्पिटलमध्ये ती ड्युटी डॉक्टर म्हणून काम करत होती. ५ फेब्रुवारी रोजी तिने रुग्णालयाच्या खोलीतच स्वतःला संपवलं. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तिने स्वतःला एक प्राणघातक डोस इंजेक्शनने दिला होता.रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना ती आपल्या खोलीत मृतावस्थेत आढळली. तिच्या अकस्मात मृत्यूमुळे



सहकारी विद्यार्थी आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेनंतर दीपिकाच्या पालकांनी तक्रार दाखल करत तिच्या मृत्यूच्या कारणांची सविस्तर चौकशी करण्याची मागणी केली.तपासादरम्यान माचवरम पोलिसांनी दीपिकाच्या मोबाईलचा फोन डेटा आणि व्हॉट्सॲप मेसेजचा अभ्यास केला. तिने मृत्यूच्या काही काळापूर्वी अलुगुपल्ली अमर सहस्य नावाच्या डॉक्टरशी बोलल्याचे समोर आले. पोलिसांनी सांगितले की ४ फेब्रुवारी रोजी रात्री १२.३० च्या सुमारास झालेला हा कॉल सुमारे नऊ मिनिटे चालला. या दोघांनी यापूर्वी अनेक वेळा संवाद साधला होता. शेवटच्या कॉलवर झालेलं बोलणं आणि दोघांमधील नातेसंबंधांतून दीपिकाने टोकाचं पाऊल उचललं असावं, असा अंदाज आहे.

# पाणी का वाया घालवतोस?' विचारणं महागात; सुरक्षारक्षकाला संपवल

**डोंबिवली :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात माणसाचा संयम किती सुटत चालला आहे, याची प्रचिती देणारी एक धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. नळ चालू ठेवून पाणी वाया का घालवतोस, असा जाब विचारल्याच्या कारणावरून एका तरुणाने सुरक्षारक्षकाची धारदार शस्त्राने वार करून निघृण हत्या केली. या घटनेमुळे डोंबिवली पश्चिमेतील कोपर परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली पश्चिमेतील कोपर परिसरातील अण्णाभाऊ साठेनगर येथे ही रक्ताळलेली घटना घडली. उमेश वाघ (वय ३५) हे परिसरात सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. बुधवारी परिसरात नळ चालू असल्याने पाणी वाया जात होते. हे पाहून उमेश वाघ यांनी तेथील तरुण अक्षय जाधव (वय ३०) याला नळ चालू ठेवण्याबाबत विचारणा केली आणि पाणी वाया घालवू नकोस असे बजावले. मात्र, हा साधा संवाद अक्षयला इतका जिव्हारी लागला की दोघांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली.वादाचे रूपांतर काही वेळातच हाणामारीत झाले.



रागाच्या भरात अक्षयने जवळ असलेल्या धारदार शस्त्राने उमेश वाघ यांच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात उमेश गंभीर जखमी झाले आणि रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. एका क्षुल्लक कारणावरून एका कष्टाळू व्यक्तीचा जीव गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.घटनेची माहिती मिळताच विष्णूनगर पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी वेगाने तपास चक्रे फिरवत आरोपी अक्षय जाधव याला काही तासांतच ताब्यात घेतले. अक्षयवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

आज दुपारी आरोपीला कल्याण न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची गुन्ह्याची गांभीर्य लक्षात घेऊन १६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहेनळाचे पाणी वाहून जाण्यासारख्या अत्यंत किरकोळ गोष्टीवरून एका तरुणाने हत्या करण्यापर्यंत टोकाचे पाऊल उचलल्याने समाजमनातून संताप व्यक्त होत आहे. विष्णूनगर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# वर्ल्ड कप आधी मी माही भाईची भेट घेतलेली

## सुर्यकुमारकडून धोनीसोबतच्या बैठकीबाबत खुलासा





**मुंबई :** वर्ल्ड कप स्पर्धेपूर्वी धोनीने दिलेला सल्ला मोलाचा ठरला, असे सूर्याने आवर्जून सांगितले. 'या स्पर्धेपूर्वी मी धोनीची भेट घेतली होती. त्या वेळी आयसीसी स्पर्धेला कसे सामोरे जावे याबाबत त्याने मार्गदर्शन केले होते. आमचा संघ खूपच चांगला आहे. आम्ही फक्त धाडसाने सामोरे जायला हवे, आम्ही बिनधास्तपणे स्पर्धेला सामोरे गेलो तर नक्कीच जिंकू, असे त्याने मला सांगितले होते. विजयानंतर त्याने व्यक्त केलेली भावना कधीही विसरू शकणार नाही,' असेही भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने नमूद केले.भारतीय संघाने २०२४मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली दीर्घ कालावधीनंतर टी-२० वर्ल्ड कप स्पर्धा जिंकली होती. सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने हे यश राखले. महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने २००७मध्ये पहिल्यांदा ही स्पर्धा जिंकली होती. 'वर्ल्ड कप विजेत्या कर्णधाराम ध्ये स्थान मिळाल्याचा नक्कीच आनंद आहे. हे यश किती मोठे आहे. त्याचा आता हळूहळू अनुभव घेत आहे. भारताच्या दिग्गज कर्णधारांसह माझे नाव घेतले जात आहे, हेच खूप आनंद देणारे आहे. भविष्यातही भारतास अधिकाधिक विजेतेपदे जिंकून देण्याचा प्रयत्न असेल,' अशी भावना त्याने व्यक्त केली.सूर्याने भारताचे वर्ल्ड कप विजेतेपदराखले. त्यामुळे त्याचे कौतुक होत आहे. '२०२४पाठोपाठ २०२६मध्ये जिंकलो याचा आनंद आहे. ही भावनाच खास आहे. आम्ही २०२४मध्ये जिंकलो, त्या वेळी ते विजेतेपद खास वाटले होते. आता हे विजेतेपद राखले, ते मायभूमीत जिंकले. त्यामुळेही खास झाले. आता लक्ष्य २०२८चे ऑलिम्पिक; तसेच त्याच वर्षी होणारी वर्ल्ड कप स्पर्धा असेल. या दोन्हीत यश मिळवले, तर २०२८ही संस्मरणीय होईल,' अशी भावना सूर्याने व्यक्त केली.वर्ल्ड कप विजेतेपदानंतर भारतीय संघाने जोरदार जल्लोष केला. 'आम्ही नेमका कसा आनंद व्यक्त केला ते सांगणे खरे तर आवडले असते. एक मात्र सांगतो आम्ही एकमेकांबरोबर यशाचा पुरेपूर आनंद घेतला. हा जल्लोष सकाळी आठपर्यंत सुरू होता,' असे त्याने सांगितले. त्याच वेळी त्याने आता काही दिवस विश्रांती घेऊन आयपीएलसाठी सराव करणार असल्याचेही सांगितले.

## संघावर पैशांचा पाऊस; बीसीसीआयनंतर आता आयसीसीकडून बक्षिस रक्कम जाहीर



**मुंबई :** ८ मार्च रोजी २०२६च्या टी-२० विश्वचषकाच्या विजेत्याची घोषणा करण्यात आली. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम साम न्यात टीम इंडियाने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करून सलग दुसऱ्यांदा ढ२० थीश्रव र्ड्री २०२६ जिंकण्याचा उल्लेखनीय पराक्रम केला. टीम इंडिया आपले जेतेपद राखणारा पहिला संघ ठरला. शिवाय, घरच्या मैदानावर जेतेपद जिंकणारा हा पहिला संघ आहे. यापूर्वी इतर कोणत्याही संघाने हा पराक्रम केला नव्हता. टीम इंडियाच्या विजयानंतर, बीसीसीआयने भारतीय खेळाडूंसाठी १३१ कोटी रुपयांची मोठी बक्षीस रक्कम जाहीर केली. आता, आयसीसीने बक्षीस रकमेबाबतही एक म हत्त्वाची घोषणा केली आहे.आयसीसीने २०२६ च्या पुरुष टी२० विश्वचषकासाठी खेळाडूंमध्ये १ अब्ज रुपयांपेक्षा जास्त रक्कम वाटली जाईल अशी घोषणा केली आहे. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर, आयसीसीने स्पर्धेच्या खेळाडूंच्या बक्षीस रकमेच्या पूलचे ११.२५ दशलक्ष डॉलर्स म्हणजे भारतीय संघाला २४.२८ कोटी रुपये मिळतील. आयसीसीनुसार, विजेत्या संघाच्या रूपात टीम इंडियाला सर्वाधिक रक्कम २,६३९,४२३ अमेरिकन डॉलर्स किंवा अंदाजे २४२.८ दशलक्ष डॉलर्स मिळतील. उपविजेत्या न्यूझीलंडला अंदाजे १३९ दशलक्ष डॉलर्स मिळतील. दक्षिण आफ्रिका तिसऱ्या क्रमांकावर आहे, त्याला १००५,५७७ डॉलर्स किंवा अंदाजे ९२.५ दशलक्ष डॉलर्स मिळतील. सेमीफायनलमध्ये टीम इंडियाकडून पराभूत झालेल्या इंग्लंडला ९० दशलक्ष डॉलर्सपेक्षा कमी रक्कम मिळेल. दरम्यान, वेस्ट इंडिज संघाला ४९.५ दशलक्ष डॉलर्स मिळतील.पाकिस्तान सुपर ८ टप्प्याच्या पुढे जाण्यात अपयशी ठरला. म्हणूनच पाकिस्तान आयसीसीकडून सर्वाधिक रक्कम मिळवणाऱ्या टॉप पाच संघांमध्ये नाही.

## हार्दिकसोबत दिसली महिका, पण कृणाल कुठेच नव्हता; भावांमध्ये बिनसल्याच्या चर्चा..



**मुंबई :** अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडला ९६ धावांनी हरवून भारताने आयसीसी पुरुष टी२० विश्वचषक २०२६ जिंकला. जगभरातील क्रिकेट चाहत्यांनी संघाचे अभिनंदन केले. अनेक खेळाडूंची कुटुंबातील सदस्यही मैदानावर उपस्थित होते. पण मात्र हार्दिकसोबत फक्त महिका दिसली. हार्दिकसोबत त्याचा भाऊ कृणाल पांड्या दिसला नाही.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघाने विजेतेपदाच्या सामन्यात २० षटकांत २५५/५ असा प्रचंड धावा काढल्या. किवींना १५९ धावांवर बाद करून, भारत तिसऱ्यांदा टी२० विश्वचषक विजेता बनला. या विजयासह, भारताने इतिहास रचला. भारत टी२० विश्वचषक यशस्वीरित्या राखणारा पहिला संघ, सलग दोनदा विजेतेपद जिंकणारा पहिला संघ आणि घरच्या मैदानावर स्पर्धा जिंकणारा पहिला संघ बनला. या जल्लोषाच्या दरम्यान, स्टार अष्टपैलू करीवळ्ज झरपवूर आणि त्याची मैत्रीण माहिका शर्मा एकत्र दिसले. स्पर्धेदरम्यान ते सर्वत्र एकत्र दिसले, परंतु त्याचा भाऊ कृणाल आणि वहिनी पंखुरी कुठेही दिसले नाहीत.पंड्या बंधू, हार्दिक आणि कृणाल काहीतरी बिनसलं असल्याची अफवा पसरली आहे. दोन्ही भावांनी आयपीएलम ध्ये मुंबई इंडियन्ससाठी एकत्र खेळायला सुरुवात केली आणि २०१६ ते २०२१ दरम्यान संघाच्या तीन आयपीएल जेतेपदां ध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. संघापासून वेगळे झाल्यानंतर, हार्दिक आणि कृणाल यांनी वेगवेगळ्या संघांवर लक्ष केंद्रित केले. हार्दिक सध्या मुंबई इंडियन्समध्ये परतला आहे, तर कृणाल गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा भाग आहे.अहमदाबादम धील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या टी२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात कृणाल आणि त्याची पत्नी दिसले नाहीत तेव्हा दोन्ही भावांमधील कटुतेच्या बातम्या अधिक तीव्र झाल्या. भावाच्या महत्त्वपूर्ण यशानंतरही, कृणालने सोशल मीडियावर काहीही पोस्ट केलेले नाही. लोक विचारत आहेत की नेहमीच त्याच्या भावाच्या बाजूने उभा राहणारा कृणाल कुठे आहे आणि तो काहीही पोस्ट का करत नाही किंवा त्याच्या भावासोबत आनंदाचे क्षण का शेअर करत नाही.

## वर्ल्ड कपनंतर आता सुरु होणार आयपीएलचा थरार; वेळापत्रक जाहीर..



**मुंबई :** २०२६ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या समाप्तीनंतर आता क्रिकेट चाहत्यांना फक्त इंडियन प्रीमीयर लीगच्या घोषणेची आतुरता होती. अशा परिस्थितीत, बीसीसीआयने इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या हंगामाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. आयपीएल २०२६ ची सुरुवात २८ मार्च रोजी गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्याने होईल.बीसीसीआयने नुकतेच पहिल्या २० सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे; उर्वरित सामन्यांची घोषणा नंतर केली जाईल. आयपीएल २०२६ च्या पहिल्या टप्प्यात देशभरातील १० शहरांमध्ये एकूण २० सामने होतील. आयपीएलचे सामने बेंगळुरू, मुंबई, गुवाहाटी, न्यू चंदीगड, लखनौ, कोलकाता, चेन्नई, दिल्ली, अहमदाबाद आणि हैदराबाद येथे होतील.चार डबल-हेडर सामने देखील होतील, पहिला सामना दुपारी ३:३० वाजता आणि दुसरा संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल. स्पर्धेच्या उद्घाटन सामन्यानंतर दुसऱ्या दिवशी, रविवार, २९ मार्च रोजी, मुंबई इंडियन्स त्यांच्या होम ग्राउंड, वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध खेळेल.आयपीएल २०२६ चा पहिला डबल-हेडर सामना ४ एप्रिल रोजी खेळवला जाईल. या दिवशी दोन सामने होतील, दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स दुपारच्या सामन्यात दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर खेळतील.

त्यानंतर, गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर संध्याकाळी होणाऱ्या सामन्यात एकमेकांसमोर येतील.आयपीएल २०२६ मध्ये, राजस्थान रॉयल्स गुवाहाटीमध्ये त्यांच्या घरच्या मोहिमेची सुरुवात करतील, जिथे ते चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स विरुद्ध खेळतील. पंजाब किंग्ज त्यांचा पहिला घरचा सामना न्यू चंदीगडमधील पीसीए स्टेडियमवर खेळतील. संपूर्ण हंगामात, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू बेंगळुरूमध्ये पाच आणि रायपूरमध्ये दोन घरच्या मैदानावर खेळतील. पंजाब किंग्ज न्यू चंदीगडमध्ये चार आणि धर्मशालामध्ये तीन सामने खेळतील, तर राजस्थान रॉयल्स गुवाहाटीमध्ये तीन आणि जयपूरमध्ये चार सामने खेळतील.

आयपीएलच्या अधिकृत हँडलवर एक पोस्ट शेअर केली आहे. 'बेंगळुरूमध्ये खेळवले जाणारे सामने कर्नाटक सरकारने स्थापन केलेल्या तज्ञ समितीच्या मंजुरीनंतरच आयोजित केले जातील. ही समिती १३ मार्च २०२६ रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियमची भेट घेईल आणि त्याची तपासणी करेल. या काळात, आयपीएल सामने आयोजित करण्यासाठी स्टेडियमची तयारी तपासण्यासाठी मॅच-डे व्यवस्थेचे एक मोठे मॉक प्रात्यक्षिक देखील केले जाईल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# हंसिका मोटवानीचा घटस्फोट; लग्नाच्या चार वर्षात मोडला संसार, मैत्रिणीच्या एक्ससोबत केलेलं लग्न

**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेत्री हंसिका मोटवानी ने तिचा पती सोहेल खतुरिया या सोबत लग्नाच्या चार वर्षातच घटस्फोट घेतला आहे. त्यांच्या वैवाहिक जीवनात दुरावा निर्माण झाल्याच्या अफवा बऱ्याच काळापासून पसरत होत्या. आता अखेर या चर्चा खऱ्या ठरल्या आहेत. अभिनेत्री हंसिका मोटवानी आणि तिचा पती सोहेल खतुरिया यांचा मुंबईतील वांद्रे कौटुंबिक न्यायालयानं घटस्फोट मंजूर केला आहे. हंसिकानं परस्पर संमतीनं वेगळं होण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती आणि तिनं पोटगीही नाकारली आहे.इंडिया टुडेच्या रिपोर्टनुसार हंसिकाच्या वतीने तिचे वकील अदनान शेख यांनी बाजू मांडली. त्यांनी सांगितलं की, लग्नानंतर हे जोडपं काही काळ एकत्र राहिलं. पण, त्यांना हळूहळू लक्षात आलं की त्यांच्या स्वभावात, मतांमध्ये आणि खूप फरक आहे, ज्यामुळे वारंवार त्यांच्यात मतभेद होत होते. याचिकेनुसार, हंसिका आणि तिच्या पतीमध्ये अनेकदा किरकोळ मुद्द्यांवरूनही वाद होत होते, त्यामुळे त्यांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला. कुटुंब, नातेवाईक





आणि मित्रांनी हे लग्न वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, परंतु ते अयशस्वी झाले. शेवटी, या जोडप्याने वेगळं होण्याचा आणि घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. हंसिकाच्या वकिलांनी सांगितलं की,हंसिका आणी तिचा पती २ जुलै २०२४ पासून वेगळे राहत आहेत. त्यांनी चर्चा केली आणि घटस्फोट घेण्यास परस्पर सहमती दर्शविली.हंसिकाने ४ डिसेंबर २०२२ रोजी मोठ्या थाटामाटात उद्योगपती सोहेल खतुरिया सोबत लग्न केलं. पण, काही महिन्यांतच त्यांच्या वैवाहिक आयुष्यात अडचणी येत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. सोहेलचं हंसिकासोबत हे दुसरं लग्न होतं.

सोहेलचं पहिलं लग्न हंसिकाची जवळची मैत्रीण रिंकी बजाजसोबत झालेलं. सोहेल आणि हंसिकाच्या घटस्फोटामुळे अभिनेत्रीच्या चाहत्यांना धक्का बसला आहे.दरम्यान, हंसिका मोटवानीच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं 'शका लाका बूम बूम' आणि 'कोई... मिल गया' या टीव्ही शोमध्ये बाल कलाकार म्हणून काम केलं. हंसिका 'देश में निकला होगा चांद', 'क्यूंकी सास भी कभी बहू थी', 'सोन परी', 'करिश्मा का करिश्मा' आणि 'बिदाई' या मालिकांमध्ये दिसली होती. हंसिकानं काही दाक्षिणात्य सिनेमांमध्येही काम केलं आहे.

## ओंकार भोजने पुन्हा मोठ्या पडद्यावर

**मुंबई :** गावच्या राजकारणात सरपंच आणि उपसरपंच यांच्यातील टशन , यांच्यातील भांडणं नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. आता ही रंगत प्रेक्षकांना पडद्यावर पहायला मिळणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील अनुभवी अभिनेते शशांक शेंडे आणि आपल्या खास विनोदी अंदाजासाठी ओळखला जाणारा ओंकार भोजने हे दोघे सरपंच आणि उपसरपंचांच्या भूमिकेत आमने-सामने येणार आहेत. आगामी 'सालबर्डी' चित्रपटातील ग्रामीण पार्श्वभूमीवर घडणाऱ्या कथेत शशांक शेंडे सरपंच गणपत पाटील तर ओंकार भोजने उपसरपंच मुकिंदा थोरात या दमदार व्यक्तिरेखा साकारणार आहेत. या दोघांच्या संवादांमधील चुरस, एकमेकांवरची टोलेबाजी आणि गावातील राजकारणातून निर्माण होणारे प्रसंग कथेला वेगळीच रंगत देणार आहेत. येत्या १७ एप्रिलला 'सालबर्डी' चित्रपट प्रदर्शित होणार आहे.या भूमिकेविषयी बोलताना शशांक शेंडे म्हणाले, 'सालबर्डी'ची कथा



रहस्यमय आहे. स्थानिक पातळीवरचे राजकारण आणि एकमेकांसोबत असलेल्या नातेसंबंधांची झलक यामध्ये पहाता येईल. ही भूमिका करताना ओंकार सोबत झालेले ट्युनिंग आणि आम्ही साकारलेली भूमिका पडद्यावर पहाणं रंजक असणार आहे. ओंकार भोजने म्हणाला, 'उपसरपंच मुकिंदा थोरात ही भूमिका खूप रंगतदार आहे. शशांक सरांसारख्या अनुभवी कलाकारासोबत काम करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. प्रेक्षकांना ही जुगलबंदी नक्कीच आवडेल.' महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या 'सालबर्डी' गावात घडणाऱ्या रहस्यमय आणि अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा थरारक शोध घेणारा हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे. या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून, चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा रमेश साहेबराव चौधरी यांनी सांभाळली आहे. सालबर्डी' चित्रपटात शशांक शेंडे, ओंकार भोजने यांच्यासोबत पूजा सावंत , भारत गणेशपुरे, अंशुमन विचारे, रोहित कोकाटे, कमलाकर सातपुते, चित्तरंजन गिरी, अनिल नगरकर, माधव अभ्यंकर, प्रवीण डाळिंबकर, अभय गिते, राजेंद्र सातार्डेकर, कोमल चौधरी आदि कलाकारांच्या भूमिका आहेत.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच या सिनेमातील अभिनेत्री पूजा सावंत हिचा लुक समोर आला होता. पोलिसाच्या भूमिकेतील तिचा लुक चाहत्यांच्या पसंतीस पडला आहे.

## बोहल्यावर चढला, पण खऱ्या आयुष्यात सिंगल

**मुंबई :** लग्नानंतर होईलच प्रेम ' ही मालिका सध्या चर्चेत असून यामध्ये जीवा-नंदिनी आणि काव्या-पार्थ यांचं लग्न झालं आहे. मालिकेमध्ये काव्याची भूमिका ज्ञानदा रामतीर्थकरनं, नंदिनीची भूमिका मृणाल दुसानीसनं, जीवाची भूमिका विवेक सांगळेनं तर पार्थची भूमिका विजय अंदाळकरनं साकारली आहे. मालिकेतील प्रत्येक भूमिकेला प्रेक्षकांचं भरघोस प्रेम मिळतंय. त्याचबरोबर या कलाकारांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्यासाठीही चाहते उत्सुक असतात. काही दिवसांपूर्वी चौघांच्या लग्नाच्या वरातीचं शुटिंग लालबागमध्ये करण्यात आलं. यावेळी विवेक सांगळेच्या आई आणि बहिणीनं, त्यानेही लवकर लग्न करावं असं म्हटलेलं.अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये विवेक सांगळेनं लग्नाबद्दल भाष्य केलं आहे.लग्नानंतर होईलच प्रेम' मालिकेतील विजय, नंदिनी यांची लग्न झाली असून ज्ञानदाचा साखरपुडा झाला आहे. त्यामुळे आता विवेक एकटाच सिंगल आहे. स्टार प्रवाह पुरस्कारावेळी राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीमध्ये विवेकनं त्याच्या लग्नाबद्दल भाष्य केलंय. मुलाखतीदरम्यान विवेक सांगळे म्हणाला की, 'मीही मनावर घेतलंय, शोधाशोध सुरू आहे. जशी कोणी भेटेल, तसं लगेच कळवण्यात येईल. लगीनघाई सुरू होईल.' त्यामुळे आता विवेक सांगळे कधी बोहल्यावर चढतोय याकडे चाहत्यांचं लक्ष लागलं आहेपुढे मालिकेमध्ये नंदिनीची भूमिका साकारणारी मृणाल दुसानीस म्हणाली की, 'विवेकला खूप चांगली बायको मिळावी अशी माझी मनापासून इच्छा आहे. कारण, तो खूप चांगला मुलगा आहे. त्याची इच्छा लवकरच पूर्ण होईल.

## पैशांसाठी तब्बल २५ बी-ग्रेड चित्रपटांमध्ये केलं काम; प्रसिद्ध अभिनेत्रीचा खुलासा..



**मुंबई :** अभिनयक्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांची लाइफस्टाइल अत्यंत आलिशान असते, असं अनेकांना वाटतं. परंतु समोर जितकं त्यांचं आयुष्य झगमगतं दिसतं, त्यात तितक्याच संघर्षांना ते सामोरं जात असतात. या संघर्षांविषयी काही कलाकार मोकळेपणे व्यक्त होतात, तर काही जण त्यावर बोलणं टाळतात. प्रसिद्ध भोजपुरी अभिनेत्री मोनालिसा नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिच्या खासगी आयुष्यातील समस्यांविषयी खुलासा केला. मोनालिसाची प्रसिद्धी आणि लाइफस्टाइल पाहून अनेकांना वाटत असेल की तिच्याकडे कसलीच कमतरता नाही. परंतु पैशांसाठी दोन-चार नव्हे तर तब्बल २५ बी-ग्रेड चित्रपटांमध्ये काम केल्याचं तिने कबुल केलं.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत मोनालिसा म्हणाली, ङ्गमला तौबा-तौबा चित्रपटाची ऑफर मिळाली होती. या चित्रपटाचं बजेट खूप कमी होतं. या चित्रपटात पायल रोहतगीची मुख्य भूमिका होती आणि तिच्यासोबत मी सहाय्यक अभिनेत्रीच्या भूमिकेत होती. या चित्रपटानंतर मी प्रकाशझोतात आली. त्यानंतर मला एकानंतर एक चित्रपटांचे ऑफर्स येऊ लागले होते. मी जवळपास २५ बी-ग्रेड चित्रपटांमध्ये काम केलंय. त्यापैकी अर्ध्याहून अधिक चित्रपट तर थिएटरमध्ये प्रदर्शितच झाले नाहीत. खरंतर यासाठी मी कृतज्ञ आहे की ते रिलीज झाले नाहीत. पण मला पडद्यावर इंटिमेट सीन करताना कधीच कोणती समस्या आली नाही.ङ्गमी आणि माझा पती विक्रांत अजूनही आर्थिकदृष्ट्या स्थिर नाही. कारण आम्हा दोघांच्या पालकांना आरोग्याच्या समस्या आहेत. त्यामुळे आम्ही जेवढं कमावतो, ते सर्व पैसे उपचारासाठी खर्च होतात. पण सुदैवाने राहण्यासाठी मोठं घर आहे आणि वीज, पाणी यांसारख्या मुलभूत गोष्टींसाठी संघर्ष करावा लागत नाही. कारण एकेकाळी आम्ही या समस्यांचाही सामना केला आहे. त्यामुळे त्या परिस्थितीत मला जे काम मिळत गेलं, ते मी करत गेली. त्याचा मला पश्चात्ताप नाहीङ्ग, असं तिने पुढे स्पष्ट केलं. मोनालिसा आज एक मोठी आणि प्रसिद्ध स्टार असली तरी एक काळ असा होता जेव्हा तिला छोट्या भूमिकेतही समाधान मानावं लागायचं. तिने बंगाली चित्रपटांमधून सुरुवात केली आणि त्यानंतर तिने भोजपुरी, बॉलिवूड चित्रपटांमध्ये काम केलं. करिअरच्या सुरुवातीच्या काळात तिने 'धुरंधर'मधील राकेश बेदी यांच्यासोबतही काम केलंय. ती मुंबईत आली तेव्हा तिने 'बाज: द बर्ड इन डेंजर' या बॉलिवूड चित्रपटात एक छोटी भूमिका साकारली होती.

# क्रीडा ई-प्रमाणफप्रणालीमुळे खेळाडूंना घरबसल्या प्रमाणपत्र...

## ५ टक्के आरक्षणासाठी ऑनलाईन सुविधा

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने क्रीडा ई-प्रमाणफ ही आधुनिक प्रणाली सुरू केली आहे. ही प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित असून खेळाडूंना घरबसल्या प्रमाणपत्र मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या प्रणालीमुळे खेळाडूंनी दिलेली माहिती मूळ नोंदींशी जुळल्यास २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होतो. तसेच प्रत्येक प्रमाणपत्रावर विशिष्ट क्यूआर कोड () कोड देण्यात येणार असून संबंधित नियुक्ती प्राधिकरण(उदा. , पोलीस भरती) हा कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची सत्यता त्वरित तपासू शकणार आहे. त्यामुळे बोगस प्रमाणपत्रांना आळा बसण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय भरती प्रक्रियेसाठी अर्ज करताना आता ङ्गक्रीडा ई-प्रमाणपत्रफ जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातील अर्जाचा विचार केला जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेतलेल्या खेळाडूंनी देखील पुढील शासकीय किंवा निमशासकीय भरतीसाठी अर्ज करताना या ऑनलाइन प्रणालीद्वारे नवीन ई-प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे.



क्रीडा ई-प्रमाणफ पोर्टलवर संघटनांकडून प्राप्त अभिलेख अपलोड करण्यात येत असून त्याच्या आधारे खेळाडूंना ५ टक्के क्रीडा आरक्षणासाठीचे प्रमाणपत्र ऑनलाइन मिळू शकते, अशी माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने दिली आहे. प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची पद्धतः या प्रणालीअंतर्गत ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे संघटनेमार्फत प्राप्त अभिलेख क्रीडा ई-प्रमाण पोर्टलवर यशस्वीरीत्या अपलोड करण्यात येत आहेत. यासाठी ज्या खेळाडूंनी अधिकृत स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवले आहे, अशा सर्व खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळावर सर्वात खाली आमच्या सेवा ( ) मध्ये ५ टक्के या टॅबमध्ये जाऊन आपली एक वेळ नोंदणी पूर्ण करावी. या नोंदणीकरिता, वैयक्तिक माहिती व क्रीडा ई-प्रमाण पोर्टलवर अर्ज या सर्व बाबींसाठी खालील माहिती खेळाडूंनी तयार ठेवावी. नोंदणीसाठी खेळाडूंनी आपल्या आधार-संलग्न (-) मोबाईल क्रमांकाचा आणि आयडीचा वापर करणे आवश्यक आहे, स्वतःचा योग्य व दैनंदिन वापर ई-मेल आय. डी., आधार कार्ड पीडीएफ, क्रीडा स्पर्धेत प्राप्त प्राविण्य प्रमाणपत्र, ज्या खेळांचे अभिलेख प्रणालीवर उपलब्ध आहे, त्यांनी तत्काळ या प्रणालीचा लाभ घेऊन आपले डिजिटल पडताळणी प्रमाणपत्र घरबसल्या प्राप्त करून घ्यावे. ज्या खेळाडूंची माहिती अभिलेखात किंवा प्रमाणपत्रे तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसतील, तर . या ई-मेलवर आपली तक्रार आपल्याकडे असलेल्या क्रीडा प्रमाणपत्रासह नोंदवावी. अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शक सूचनांसाठी खेळाडूंनी या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच अन्य खेळांचे अभिलेख प्रणालीवर उपलब्ध करून दिल्यानंतर त्याबाबतची माहिती त्वरित याद्वारे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५ ची स्पर्धा), ज्युडो (२०२४ ची स्पर्धा), कुराश (२०२४-२५ व २०१७-१८) ह्या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध आहेत, त्याच खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत. इतर पात्र खेळांच्या खेळाडूंनी नोंदणी करावी, अशी माहिती जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्याकडून प्रसिद्धी पत्रकाव्दारे देण्यात आली आहे.

# सुलतानपुरात डॉ. हेमराज लाहोटी यांच्या वतीने दावत-ए-इफ्तार उत्साहात संपन्न; सामाजिक सलोख्याचे दर्शन!

जनसंचलन/बुलढाणा

पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून सामाजिक एकता, बंधुभाव आणि परस्पर सौहार्द वाढवण्याच्या उद्देशाने, सुलतानपूर येथील नामांकित व्यक्तिमत्व डॉ. हेमराज रामप्रसादजी लाहोटी यांच्या वतीने भव्य दावत-ए-इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार, ११ मार्च २०२६ रोजी स्थानिक जि. प. उर्दू शाळेच्या परिसरात हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. हाजी आणि उमराह धारकांचा विशेष सत्कार या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे सुलतानपूर परिसरातील ज्या मुस्लिम बांधवांनी हज आणि उमराह यात्रा पूर्ण केली आहे, तसेच जे नजीकच्या काळात या पवित्र यात्रेला जाणार आहेत, अशा सर्व सन्माननीय व्यक्तींचा डॉ. हेमराज लाहोटी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.



या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.सर्वधर्मीय मान्यवरांची उपस्थिती या सामूहिक इफ्तारसाठी परिसरातील मुस्लिम बांधवांसह माजी आमदार संजय रायमुलकर, संजय लाहोटी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाज-ए-मगरिब नंतर सर्व उपस्थितांनी एकत्र बसून इफ्तारचा आनंद घेतला. यावेळी संपूर्ण परिसरात सर्वधर्म समभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश पाहायला मिळाला. आयोजकांचे मनोगत याप्रसंगी बोलताना डॉ. हेमराज लाहोटी म्हणाले की, ङ्गङ्गरमजान हा महिना संयम आणि मानवतेची शिकवण देतो. समाजातील सर्व घटकांमध्ये प्रेम आणि आपुलकी वाढावी, या हेतूने आम्ही या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आज सर्व बांधवांना एकत्र पाहून मनाला अत्यंत समाधान वाटले.ङ्कङ्क या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सुलतानपूरच्या या सामूहिक इफ्तारने समाजासमोर एकतेचे एक आदर्श उदाहरण उभे केले आहे.

# महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण व संदर्भाने जनजागृती कार्यक्रम संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

महिला दिनानिमित्त परिवार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, आणि आभाळमाया बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सक्षमीकरण व जनजागृती या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, कर्करोगाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन करणे तसेच वाढत्या प्रदूषणापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमात उपस्थित महिलांना आरोग्यपूर्ण आणि सशक्त भविष्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी श्री स्वामी समर्थचे अध्यक्ष गजानन राऊत, विवेकानंद अर्बनचे अध्यक्ष बारोटे सर, परिवार अर्बनचे मधुकर सावळे, विमल सावळे, च्या माधुरी वाघमारे तसेच चे सहसंस्थापक अनुप गवळी हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी महिलांच्या आरोग्य, सक्षमीकरण आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा जनजागृती कार्यक्रमांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाला परिसरातील अनेक महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी ङ्गसशक्त स्त्री, समृद्ध समाजफहा संदेश देत महिलांच्या सशक्तीकरणासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.



# बुलडाण्यात १२ मार्च रोजी कर्तृत्ववान महिलांचा गौरव सोहळा

## छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती समितीचा पुढाकार; गोवर्धन हॉलमध्ये रंगणार सोहळा

जनसंचलन/बुलढाणा

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून, समाजाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ आणि त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी ङ्गछत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती सांस्कृतिक समितीफ्च्या वतीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा गुरुवार, १२ मार्च २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता, बुलडाणा अर्बन बँक समोरील गोवर्धन हॉल येथे पार पडणार आहे. आजच्या प्रगत युगात महिलांनी शिक्षण, प्रशासन, समाजकारण आणि क्रीडा अशा प्रत्येक क्षेत्रात गरुडझेप घेतली आहे. महिलांनी समाजाच्या प्रगतीत दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांना अधिक प्रोत्साहन देणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये:

उल्लेखनीय महिलांचा सत्कार: विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात येईल.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन: महिला सक्षमीकरण, समाजातील स्त्रियांची बदलती भूमिका आणि त्यांचे योगदान या




विषयावर मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

प्रेरणादायी सोहळा: नवीन पिढीतील युवक-युवतींना प्रेरणा मिळावी, या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

उत्स्फूर्त उपस्थितीचे आवाहन: ङ्गङ्गस्त्रियांचा सन्मान करणे ही आपली संस्कृती आहे. हा सोहळा केवळ एक सत्कार नसून महिलांच्या संघर्षाचा आणि यशाचा उत्सव आहे. तरी परिसरातील सर्व महिला, मान्यवर नागरिक, युवक आणि युवतींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,ङ्घङ्घ असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती सांस्कृतिक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पोलिसांचे मोठे यश; २०२५ मध्ये हरवलेल्या ८७% महिलांचा लावला शोध!




जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात विविध कारणांमुळे महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंतेचा विषय ठरत असतानाच, बुलढाणा जिल्हा पोलीस दलाने या प्रकरणांचा छडा लावण्यात मोठे यश संपादन केले आहे. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या विशेष मोहिमेमुळे, वर्ष २०२५ मध्ये नोंद झालेल्या एकूण प्रकरणांपैकी तब्बल ८७ टक्के महिलांचा यशस्वी शोध घेऊन त्यांना कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले आहे. महिला बेपत्ता होण्याच्या घटनांचा गांभीर्याने विचार करून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील नियंत्रण कक्षात स्वतंत्र ङ्गमहिला मिसिंग डेस्कफ स्थापन करण्यात आले आहे. तसेच, जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर ङ्गमिसिंग सेलफ कार्यान्वित करण्यात आले आहेत. या दोन्ही यंत्रणांनी एकमेकांशी योग्य समन्वय ठेवून तांत्रिक तपास आणि माहितीच्या आधारे शोधकार्याला गती दिली. या चोख नियोजनामुळेच २०२५ मधील ८७ टक्के प्रकरणांचा यशस्वी निकाल लागला आहे.

प्रलंबित प्रकरणांवर लक्ष केंद्रित केवळ २०२५ मधीलच नव्हे, तर मागील काही वर्षांतील प्रलंबित प्रकरणांवरही पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे. पोलीस दलाच्या माहितीनुसार, सन २०२१ पासून आजपर्यंत महिला बेपत्ता होण्याची एकूण २८४ प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. या महिलांचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलीस दल सर्वतोपरी प्रयत्न करत असून, तपासाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.

कुटुंबियांना दिलासा

जिल्हा पोलीस दलाच्या या सक्रियतेमुळे अनेक कुटुंबियांना दिलासा मिळत आहे. ङ्गमहिला मिसिंग डेस्कफ्च्या माध्यमातून महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि बेपत्ता प्रकरणांचा तातडीने छडा लावण्यासाठी पोलीस दल अहोरात्र कार्य करत असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# बुलढाणा पोलिसांचा अवैध धंद्यांवर सर्जिकल स्ट्राईक; १० ठिकाणी छापे, १७ आरोपी जेरबंद!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील अवैध जुगार, वरली मटका आणि गावठी दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या () पथकाने जिल्ह्यातील १० वेगवेगळ्या ठिकाणी धडक कार्यवाही करत एकूण १७ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत रोख रकमेसह एकूण २५,६२५/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकांचा क्लीन बुलढाणा मोहिमेचा भाग

जिल्ह्यात वरली मटका, तासपत्ता जुगार आणि अवैध दारू विक्रीमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढू नये, यासाठी पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कडक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार एलसीबीचे पोलीस निरीक्षक श्री. सुनील अंबुलकर यांनी विविध स्वतंत्र पथके तयार करून जिल्ह्यात धाडसत्र राबवले. दिनांक १० मार्च २०२६ रोजी राबवलेल्या या मोहिमेत जुगार आणि दारूबंदी कायद्यांतर्गत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली:

जुगार प्रतिबंधक कारवाई (तासपत्ता व मटका):

तामगाव (एकलारा बानोद): तासपत्ता खेळणाऱ्या सागर शंकर गिरी (३२) व इतर ५ जणांकडून ११,९९०/- रुपये जप्त.

खामगाव (शिवाजीनगर): आकाश श्याम वानखडे (२२) याच्याकडून वरली मटका साहित्य व ५,११५/- रुपये हस्तगत.

पिंपळगाव राजा (काळेगाव): भगवानसिंग सोळंके व इतर २ आरोपींकडून ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त.

इतर शहरे: अंत्री खेडेकर (अंढेरा), चिखली, देऊळगाव मही, मेहकर टाऊन आणि रोहिणखेड



(धामणगाव बढे) येथेही मटका बुकींवर छापे टाकून आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले.

अवैध दारू विक्रीवर हातोडा:

येवती (लोणार): राजेंद्र रंगनाथ डोईफोडे (६०) याच्याकडून १,२००/- रुपयांची देशी दारू जप्त.

निमगाव बु. (किनगाव राजा): समाधान पिराजी वाघुळ (२८) याच्याकडून १,२१०/- रुपयांची अवैध दारू हस्तगत.

दक्ष पोलीस पथक

ही यशस्वी कामगिरी अपर पोलीस अधीक्षक श्री. श्रेणिक लोढा (खामगाव) आणि श्री. अमोल गायकवाड (बुलढाणा) यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. सुनील अंबुलकर, सपोनि यशोदा कणसे, पोउपनि पंकज सपकाळे, प्रताप बाजड व स्थानिक गुन्हे शाखेच्या अंमलदारांनी पार पाडली. जिल्ह्यातील अवैध धंदे करणाऱ्यांचे या कारवाईमुळे धाबे दणाणले असून, अशा कारवाया भविष्यातही सुरू राहणार असल्याचे संकेत पोलीस प्रशासनाने दिले आहेत.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनेल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलढाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८